## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०८/१२/१७

## दि.०८/१२/१७ रोजी दु.१२/०० वा.ते २२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ४१६/१७,भादविक ४९८(अ),३०६ |
| **फिर्यादी** | एक पुरुष,वय ६० वर्षे,रा.यवतमाळ |
| **आरोपी** | गजानन किसना पवार,रा.लेन नं.१३ राजाराम पाटील नगर संजय चव्हाण यांचे खोलीत खराडी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | मागील ३ वर्षा पासुन ते दि.३०/११/२०१७ रोजी पर्यंत लेन नं.१३ राजाराम पाटील नगर संजय चव्हाण यांचे खोलीत खराडी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुलगी अश्विनी गजानन पवार,वय २५ वर्षे,रा.सदर हिचे लग्न तीचा पती इसमा बरोबर होवुन,ती दोन मुलांसह सासरी नांदत असताना, वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,यातील नमुद इसमाने तीस माहेराहुन पैशाची मागणी करून,तीस टोचुन बोलुन,तीचा शारिरीक व मानसिक छळ करून,तीचे राहते घरी दि.३०/११/२०१७ रोजी रात्रौ २१/४५ वा.चे सुमारास गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.जे.घाग ९९२१५१९९१८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३९४/१७,भादविक १४३,१४७,१४८,१४९,३२३,३२४,४२७,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | सचिन माने वय १९ वर्षे,रा.गुलटेकडी,पुणे |
| **आरोपी** | १)एक विधीसंर्षीत बालक,वय १७ वर्षे, २)बापु मल्लीकार्जुन शेकापुरे,वय २३ वर्षे, ३)शंकर नागप्पा निखले,वय २९ वर्षे, ४)सचिन हनुमंत हत्ती,वय २२ वर्षे, ५)सचिन सिताराम शिंगे, वय २३ वर्षे, ६)सागर मल्लिकार्जुन शेकापुरे,वय २१ वर्षे, ७)अनिल सोमनाथ कांबळे, वय २४ वर्षे, ८)संजय उत्तम नडगेरी,वय २५ वर्षे,सर्व रा.४२५/२६ मिनाताई ठाकरे वसाहत गुलटेकडी,पुणे (अ.क्र.२ ते ८ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/१२/२०१७ रोजी रात्रौ २३/४५ वा.चे सुमारास विठाबाई पुजारी, उदयानासमोर महर्षिनगर, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रांसह उभे असताना, यातील नमुद इसम संजय नडगेरी हा लघुशंकेसाठी गार्डनमध्ये गेला असता फिर्यादीने बाग बंद असताना गेट का उघडले अशी विचारणा केल्याचा राग येवुन संजय नडगेरी याने फिर्यादीस शिवीगाळ करुन, त्याची गंचडी पकडली लोकांनी मध्यस्थि करुन भांडणे सोडविल्या नंतर संजय नडगेरी याने वर नमुद इसमांना बोलावुन घेवुन गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी तसेच लाकडी बांबुने मारहाण करुन, जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पी.आर.मोरे ९५९४९६२५३९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३९५/१७,भादविक १४३,१४७,१४८,१४९,३२३,३२४,५०४ |
| **फिर्यादी** | सागर शेकापुरे,वय २१ वर्षे,रा.गुलटेकडी,पुणे् |
| **आरोपी** | १)सचिन परशुराम माने, वय १९ वर्षे, रा.४२५/२६ मिनाताई ठाकरे वसाहत गुलटेकडी, पुणे २)टिक्या शेलार, ३)सौरभ खोपटकर, ४)विपुल इंगवले, ५)आकाश परदेशी, ६)कुणाल जाधव, ७)राहुन भरगुडे, ८)दुर्वेश शितोळे, सर्व रा.घोरपडी पेठ,पुणे (अ.क्र.१ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/१२/२०१७ रोजी रात्रौ २३/३५ वा.चे सुमारास विठाबाई पुजारी, उदयानासमोर महर्षिनगर, पुणे |

**तपशिल** वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी यांचे मित्राचे वाढदिवसा निमीत्त संत नामदेव शाळेचे कमानीजवळ थांबले असताना, त्याचा मित्र संजय नडगेरी हा ओरडत पुजारी गार्डन मधुन बाहेर आला व लघुशंकेला जाण्याचे कारणावरुन सचिन माने व त्यांचे मित्रांनी त्याला मारहाण केल्याचे सांगितले त्यांचा जाब विचारण्यासाठी फिर्यादी व त्यांचे मित्र गेले असता यातील नमुद इसमांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन, फिर्यादीस शिवीगाळ करुन, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व टोकाजवळ लोखंडी तारेची गुंडाळी असलेल्या दांडक्याने मारहाण करुन, जखमी केले आहे. व भांडणे सोडविण्यासाठी आलेल्या दोन मित्रांनाही मारहाण केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एस.ए.पाटील ९५५२८२६००३

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**